# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

**अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०५**

**दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०८५२ फॅक्स (०२१३३) २३०५८३**

**ईमेल :** gcoeara@gmail.com **वेबसाईट :** www.gcoeara.ac.in


जा.क.शाअसंमअ/विवि/२०१७/ 3602 दिनांक - 6.10.17

## -: विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना :-

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम,द्वितीय,तृतिय व चतुर्थ वर्षात महाविद्यालयातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, चालू शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शासनाच्या सर्व शिष्यवृत्तीच्या योजना (समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, ईबीसी, डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना, अपंग/अ[illegible]संख्याक/माजी सैनिक पाल्य शिष्यवृत्ती,) करीता डी[illegible]टी (DIRECT BENEFIT TRANSFAR) पोर्टल वरुन ऑन लाईन शिष्यवृत्ती माहिती सादर करणे अनिवार्य आहे. या संदर्भात विद्यार्थ्यांना ऑनलाईन माहिती भरण्या संबंधी विद्यार्थी विभागा मार्फत दि.२०.९.२०१७ रोजी प्रशिक्षण आयाजित करण्यात आले होते. डी.बी.टी पोर्टलवर माहिती भरताना **शैक्षणिक कागदपत्रांच्या मुळ प्रती अपलोड कराव्यात झेरॉक्स अपलोड करु नयेत.** डी.बी.टी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज तात्काळ भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची लिंक बंद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांची तात्काळ ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरुन भरलेल्या अर्जाची प्रींट काढून त्या सोबत अत्यावश्यक कागदपत्रे व हमीपत्र (सोबत जोडला आहे) जोडून अर्ज विद्यार्थी विभागात जमा करावेत. अर्ज सादर न केल्यामुळे शिष्यवृत्ती नामंजूर झाल्यास शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येईल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ.ए.एस.पंत)
प्राचार्य
शासकीय अभि. व सं. महाविद्यालय
अवसरी (खुर्द) ता.आंबेगाव,जि.पुणे.

प्रत :-

1) विभागप्रमुख :- उपयोजित विज्ञान / स्वयंचल / अणुविद्युत / उपकरणीकरण / यंत्र / स्थापत्य / संगणक / कर्मशाळा – त्यांनी ही सूचना विभागीय सूचना फलकावर लावावी.
2) सूचना फलक – मुलांचे वसतिगृह – क 1 व 2
3) सूचना फलक – मुलींचे वसतिगृह
4) सर्वसाधारण सूचना फलक
5) संगणक विभाग – यांना सदर प्रत महाविदयालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेकरिता

विद्यार्थ्यांचे हमीपत्र (हमीपत्र हे रु.१००/- स्टॅम्प पेपरवर बनवणे गरजेचे आहे.)

मी खाली सही करणार, कुमार/कुमारी ------------------------------------------
प्रवर्ग ----------- वर्ग - प्रथम / द्वितीय / तृतिय / चतुर्थ शाखा ----------------------------
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, मी आपल्या शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी खुर्द ता.आंबेगाव,जि.पुणे या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित आहे. मी महाविद्यालयात प्रवेश घेताना शुल्क रक्कम रु. जमा केलेले आहे. तसेच एआरसी ---------------------------------------------------------येथे केली आहे व रुक्कम रु. ------------ डी.डी./ ऑन लाईन ने जमा केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्र.इबीसी-२०१६/प्रक्र.२२१/शिक्षण -१,दि.३१.०३.२०१६ नुसार व शासन निर्णय क्र.ईबीसी-२०१७/ प्र.क्र.४०३/शिक्षण - १,दि.७ ऑगस्ट २०१७ नुसार खाली दिलेले नियम मी स्वत: वाचलेले असून ते मला मान्य आहे.जर मी खाली दिलेल्या नियमांमध्ये अपात्र ठरल्यास नियमानुसार मी चालू शै.व.२०१७-१८ ची पूर्ण शुल्क भरण्यास तयार आहे.असे आपणास हमीपत्र सादर करीत आहे.

१) माझी महाविद्यालयातील उपस्थिती ७५% पेक्षा जास्त असेल.
२) वर्षाच्या दोन्ही सत्र परीक्षेला मी उपस्थित असेल .
३) जर चार वर्षाच्या अभ्यासक्रमा मध्ये दोन वेळा अनुत्तीर्ण झाल्यास मी पुढील शिष्यवृत्तीसाठी कायमस्वरुपी अपात्र असेन.
४) मी प्रत्येक वर्षी शिष्यवृत्ती करीता ऑनलाईन अर्ज महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करेन.
५) मी जातवैधता प्रमाणपत्र वेळेत जमा न केल्यास शै.व.चे पूर्ण शुल्क भरण्यास तयार आहे.
६) जातवैधता प्रमाणपत्रा अभावी शिष्यवृत्ती नामंजूर झाल्यास शै.व.चे पूर्ण शुल्क जमा करेन.

चालू शै.व.२०१७-१८ पासून विद्यार्थ्यांची अनुज्ञेय शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही संबंधीत शैक्षणिक संस्था/महाविद्यालय यांना करण्याऐवजी शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदाने, निर्वाह भत्ता,विद्यावेतने विषयक लाभाची रक्कम थेट संबंधीत विद्यार्थ्यांचा आधार संलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर रक्कम माझ्या बँक खाते मध्ये जमा झाले नंतर दहा दिवसांच्या आंत महाविद्यालयाचे पूर्ण शुल्क महाविद्यालयात जमा करेण.अशी हमी देत आहे.

वडिलांचे/पालकांची सही

मी विद्यार्थ्याचा पालक/वडिल वरील नियम/अटी वाचले असून मला मान्य आहेत.

विद्यार्थ्याची सही-

-----------------------------------

वडिलांचे/पालकांचे पूर्ण नाव

-----------------------------------

विद्यार्थ्याचे पूर्ण नाव

D+A
[handwritten initials and note]